सांगोला | शैक्षणिक

सावित्रीबाई फुले प्रशालेमध्ये सायबर सुरक्षा कार्यशाळा संपन्न

By **Team Sangola Live** - September 10, 2025 0

सोनंद (प्रतिनिधी): सावित्रीबाई फुले प्रशाला व ज्युनिअर कॉलेज येथे मंगळवार दि. 9 सप्टेंबर रोजी एमआयटी कॉलेज आणि क्विक हिल् फाउंडेशन पुणे यांचे मार्फत सायबर शिक्षा फोर सायबर सुरक्षा उपक्रम अंतर्गत एमआयटी आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज आळंदी आणि क्विक हिल् फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने," सायबर शिक्षा फोर सायबर सुरक्षा" संपन्न झाला.

या अंतर्गत कार्यशाळा संपन्न झाली. विद्यार्थ्यांना डिजिटल युगात सायबर गुन्हा विषयी जागरूक करणे' त्यांना सुरक्षित डिजिटल नागरिक बनवणे' फिशिंग 'ऑनलाइन फसवणूक' सोशल मीडियाचा सुरक्षित वापर' पासवर्ड व्यवस्थापन या सर्व मुद्द्यावर कुमारी गायत्री पाटील तिने उत्कृष्टरित्या कार्यशाळा घेतली. प्रात्यक्षिके करून दाखवली एमआयटी आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राध्यापक अमित काळे आणि क्विक हिल फाउंडेशनचे अजय शिर्के यांच्या समन्वयाने या कार्यशाळेचे आयोजन होते आणि याच उपक्रमाचा एक भाग म्हणून ही आजची कार्यशाळा संपन्न झाली विद्यार्थ्यांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला.